# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक** क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/ ५०५

**कालमर्यादा (२९.६.२०१९ सायं ५.००)** दिनांक : 28 JUN 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती ऑनलाईन प्रणालीवर अद्ययावत करणेबाबत.....

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक

१. तंशिप्र १२१९/ प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५५८, दिनांक २५.६.२०१९
२. तंशिप्र १२१९/ प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५६५, दिनांक २६.६.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० वर्षासाठी पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत आहे. या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस संबंधित शिखर परिषदांची मान्यता (AICTE,PCI,COA इ.), संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यासाठी http://technical.mahacet.org/ या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार आपल्या संस्थेची माहिती ऑनलाईन पध्दतीने दिनांक २९.६.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करण्यात यावी. सोबत प्राधिकरणाने दिलेल्या सूचनांची प्रत जोडली आहे.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता माहिती विहीत कालावधीत(दि.२९.६.२०१९ सायं ५.०० वाजेपर्यंत) व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. संस्थांनी ही माहिती अचूक भरणे अत्यावश्यक आहे. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शवून त्यानुसार प्रवेश करण्यात येणार असल्यामुळे ही माहिती अचूक भरण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार असेल आणि जबाबदारी निश्चित करुन प्रकरणनिहाय आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

प्रत : सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर यांना माहितीसाठी

E:\Budage\2019-20\General Correspondence\Letter to RO regarding verify the institute information within time.docx